डोंगर पायथ्याशी निसर्ग निसर्गरम्य वातावरणात...अस्सल गावरान तडका...
हॉटेल अमरप्रित
शुध्द शाकाहारी व मांसाहारी
वाढदिवसासाठी सुसज्य व्यवस्था
फॅमिली साठी स्वतंत्र व्यवस्था
चुलीवरचे कंदुरी मटन व भाकरी
चऱ्हाटा वैधकिनी रोड,जाधववाडी ता.जि.बीड

दैनिक
लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
LOK AARAMBH
dainiklokaarambh@gmail.com
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

प्रतिनिधी नेमणे आहे.
बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा
९४०३६ ४१४८२
राहुल मारोतीराव वाईकर

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | शनिवार ७ डिसेंबर २०२४ | अंक ३६३ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

महायुतीला राज्य सरकार चालवणे अवघड होणार?

फडणवीस सरकार येताच मनोज जरांगे यांचे अल्टीमेटम

मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे देवेंद्र फडणवीस सरकार येताच आक्रमक झाले आहे. आता त्यांनी मराठा आरक्षणासाठी राज्य सरकारला पुन्हा एकदा अल्टीमेटम दिला आहे. ५ जानेवारीपर्यंत सरकारने मराठा आरक्षणाचा विषय मार्गी लावावा, असे मनोज जरांगे यांनी म्हटले आहे. सरकार स्थापन झाल्याबद्दल महायुती सरकारला शुभेच्छा देत ते म्हणाले, आता जनतेचे प्रश्न मार्गी लावणे गरजेचे आहे. सरकारने ५ जानेवारीपर्यंत मराठा समाजाच्या सगळ्या मागण्या पूर्ण कराव्यात. जर पुन्हा एकदा मराठा समाज विरोधात गेला तर सत्ता चालवणे सुद्धा अवघड होईल, असा इशारा त्यांनी दिला.

दीड वर्षांपासून न्याय नाही

मनोज जरांगे म्हणाले, मराठा समाजाचे आंदोलन दीड वर्षापासून सुरु आहे. परंतु मराठा समाजाला न्याय अजून मिळाला नाही. आता ५ जानेवारीपर्यंत मराठा आरक्षणाचा प्रश्न मार्गी लावावा. काही महिन्यांपूर्वी मंत्रिमंडळाचे शिष्टमंडळ अंतरवाली आले होते. त्यावेळेस त्यांनी हे सगळे सांगितले होते. त्यामुळे आता ५ जानेवारीपर्यंत संधी दिली. त्यामुळे संधीचा सोने करा. अन्यथा मराठे पुन्हा आंदोलन सुरु करतील, असा इशारा जरांगे यांनी दिला आहे.

या कार्डमुळे शेतकऱ्यांना मिळणार डिजिटल ओळख

नवी दिल्ली : केंद्र सरकारने देशातील करोडो शेतकऱ्यांसाठी एक नवा उपक्रम सुरू केला आहे. आता सरकार शेतकऱ्यांना शेतकरी ओळखपत्र देण्याची तयारी करत आहे. हे कार्ड आधार कार्डसारखेच असेल. या कार्डमुळे शेतकऱ्यांना डिजिटल ओळख मिळणार आहे. पुढील तीन वर्षांसाठी सर्व शेतकऱ्यांकडे शेतकरी ओळखपत्र असावे यासाठी सरकार प्रयत्न करत आहे. त्याच वेळी, चालू आर्थिक वर्षासाठी सरकारचे लक्ष्य आहे की शेतकरी ओळखपत्रे ६ कोटी शेतकऱ्यांपर्यंत पोहोचली पाहिजेत. हे कार्ड राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांद्वारे बनवले जाईल. त्यामुळे कार्डद्वारे शेतकऱ्यांवर लक्ष ठेवण्यास मदत होणार आहे. हे कार्ड शेतकऱ्यांवर लक्ष ठेवण्यासाठी वापरले जाणार आहे. या कार्डद्वारे शेतकऱ्याकडे किती जमीन आणि जनावरे आहेत हे सरकारला कळणार आहे. याशिवाय कार्डच्या माध्यमातून शेतकऱ्याने कोणते पीक घेतले आहे हे कळेल. हे कार्ड देशातील सर्व शेतकऱ्यांना डिजिटल ओळख देण्यास मदत करेल. हे कार्ड शेतकऱ्यांसाठी तसेच सरकारसाठीही खूप फायदेशीर ठरणार आहे. या कार्डद्वारे शेतकऱ्यांना पीक विमा, पीक कर्ज यांसारख्या सेवांचा सहज लाभ घेता येणार आहे. अगदी गावाच्या जमिनीचे नकाशे आणि पेरणी केलेल्या पिकांचीही माहिती मिळेल. हे कार्ड डिजिटल पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चर (उ्झख) स्वरूपात केले गेले आहे.

११ कोटी शेतकऱ्यांना होणार फायदा

११ कोटी शेतकऱ्यांना डिजिटल ओळख देण्यासाठी सरकारने डिजिटल कृषी मिशन नावाची योजना तयार केली आहे. २०२६-२७ या आर्थिक वर्षात देशातील सर्व शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळावा, असे सरकारचे उद्दिष्ट आहे. सध्या सरकारकडे ११ कोटी शेतकऱ्यांची आकडेवारी आहे. हे सर्व शेतकरी पीएम किसान सन्मान निधी योजनेचे लाभार्थी आहेत.

संत महंतांच्या उपस्थितीत श्री गुरूकृपा मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटलचा शुभारंभ

विविध क्षेत्रातील मान्यवरांनी दिल्या शुभेच्छा

बीड दि.६ : मागील काही वर्षापासून वैद्यकीय क्षेत्रात असलेल्या डॉ. अभिजित येवले यांनी याच क्षेत्रात नवीन पाऊल टाकले आहे. सुसज्ज व सर्व सुविधायुक्त श्री गुरूकृपा मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल अॅन्ड रिसर्च सेंटरची उभारणी केली. शुक्रवारी (दि.६) ह.भ.प.नारायण महाराज गिरी व ह.भ.प.महादेव महाराज चाकरवाडीकर यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या.

बीड शहरातील जालना रोडवरील मंत्री बँकेच्या पाठीमागे श्री गुरूकृपा मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल अॅन्ड रिसर्च सेंटर सुरू झाले आहे. याचे उद्घघाटन शुक्रवारी सकाळी अकरा वाजता ह.भ.प.नारायण महाराज गिरी, ह.भ.प.महादेव महाराज चाकरवाडीकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या. तर बीडकरांनी टाकलेला विश्वास याला कधीही तडा जाऊ न देता एक चांगली आरोग्य सेवा देण्याचे काम श्री गुरुकृपा हॉस्पिटलची टीम करेल असा विश्वास डॉ.अभिजित येवले, डॉ.निलेश मिसाळ, डॉ.बालाजी नवले, डॉ.प्रशांत ढाकणे, डॉ.एकतपुरे धनश्री , डॉ.प्रीतम लोध यांनी व्यक्त केला. तसेच शुभेच्छारुपी आशीर्वाद दिल्याबद्दल सर्वांचे आभार मानले.

युवा महोत्सवातून देशाचे भविष्य घडण्यास मदत - शिवकुमार स्वामी

दोन दिवसीय युवा महोत्सवाचा समारोप

बीड, दिनांक १५ : बीडच्या युवकांमध्ये कलागुणांची खान आहे. बीड जिल्ह्यातील युवकांसाठी जिल्हास्तर युवा महोत्सव आयोजन समिती मार्फत युवा महोत्सव कार्यक्रमाचे आयोजन अत्यंत चांगल्या प्रकारचे झालेले आहे. युवकांना अशा महोत्सवातून प्रोत्साहन मिळते. यातूनच देशाचे भविष्य घडण्यासही मदत होते, असे प्रतिपादन निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी केले. जिल्हा क्रीडा संकुल येथे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा जिल्हा क्रीडा परिषद, नेहरू युवा केंद्र यांच्या वतीने आयोजित दोन दिवसीय जिल्हास्तर युवा महोत्सव समारोपप्रसंगी ते बोलत होते. जेष्ठ क्रीडा संघटक तथा शिव छत्रपती पुरस्कारार्थी प्रा. जे. पी. शेळके, जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर, जिल्हा युवा अधिकारी अरूणा कोचुरे, उसतोड कामगार संघटनेचे अध्यक्ष उध्दव कराड, जेष्ठ क्रीडा व युवा संघटक प्रा. दिनकर थोरात, कलावंत तथा साने गुरूजी क. महाविद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती डॉ. कविता कराड आर्दीची उपस्थिती होती. सदर युवा महोत्सवात सहभागी होऊन प्राविण्य मिळवणाऱ्या युवकांना विभागस्तर युवा महोत्सवासाठी शुभेच्छा देवून जिल्ह्यातील जास्तीत जास्त युवकांची राज्य व राष्ट्रयस्तरावरील युवा महोत्सवासाठी निवड व्हावी, अशी अपेक्षाही श्री. स्वामी यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यागर यांनी केले. सूत्रसंचालन पंडित चव्हाण केले. आभार श्रीमती कोचुरे यांनी मानले. दिनांक ०५ डिसेंबर २०२४ रोजी कविता लेखन, कथालेखन, चित्रकला स्पर्धा, विज्ञान व तंत्रज्ञान यामधील नवसंकल्पना या बाबींच्या स्पर्धा घेण्यात आल्या. दिनांक ०४ व ०५ डिसेंबर २०२४ रोजी झालेल्या स्पर्धात्मक बाबीमध्ये प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक मिळविलेल्या कलाकरांना निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांचे हस्ते व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत ट्रॉफी (चषक) देऊन गौरविण्यात आले. जिल्हास्तर युवा महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी तालुका क्रीडा अधिकारी पंडित चव्हाण, क्रीडा अधिकारी अनिकेत काळे, कालिदास होसुरकर, क्रीडा मार्गदर्शक सतिष

राठोड, रेवनाथ शेलार, अविनाश पाटील, क्रीडा विभागाचे धनेश करांडे, श्रीमती त्रिगुणा वाघमोडे, क्रीडा संयोजक जितेंद्र आराक, सचिन जाधव, किशोर काळे, मंगेश वडमारे आर्दीनी परीश्रम घेतले.युवा महोत्सवा करिता परीक्षक म्हणून प्रा. डॉ. बी. टी. ताटे, प्रा. एस. के. परदेशी, प्रा. डॉ. संजय कांबळे, प्रा. डॉ पुनम ओहरी, प्रा. रोहीनी धारमोडे, सुमीत गायकवाड, वाघ राधाकृष्ण, लक्षीकांत दोडके, विलास सोनवने, प्रा. दिपक जमदाळे, प्रा. डॉ. संतोष मस्के, प्रदिप मांजरे, प्रा. डॉ. पांडुरंग सुतार, प्रा. राम गव्हाणे यांनी काम पाहीले. जिल्हास्तर युवा महोत्सवाचा निकाल पुढील प्रमाणे आहे. १) समुह लोकनृत्य प्रथम क्रमांक - श्री. नरेंद्र मोदी परिचारिका प्रशिक्षण संस्था, केज, जि. बीड, व्दितीय क्रमांक - बलभिम महाविद्यालय, बीड २) समुह लोकगीत :- प्रथम क्रमांक - सौ. के. एस. के. महाविद्यालय, बीड, व्दितीय क्रमांक- बलभिम महाविद्यालय, बीड तृतीय क्रमांक - तुलसी महाविद्यालय, बीड ३) वक्तृत्व स्पर्धा (हिंदी / इंग्रजी) प्रथम क्रमांक- अमृता श्रीकांत क्षिरसागर, व्दितीय क्रमांक - उम्मे हानी नुराब अत्तार, तृतीय क्रमांक - चव्हाण रोहन नामदेव तृतीय क्रमांक - साक्षी उध्दवराव कराड ४) चित्रकला प्रथम क्रमांक- विशाखा विकास आगळे व्दितीय क्रमांक - ॠतुजा जालिंदर काळे, तृतीय क्रमांक- वैष्णवी ज्ञानेश्वर चौरे ५) कथालेखन प्रथम क्रमांक- सुरज राधाकिसन उफाडे व्दितीय क्रमांक - साक्षी उध्दवराव कराड तृतीय क्रमांक - रंजित दिलीप शिंदे ६) कविता लेखन प्रथम क्रमांक- सुरज राधाकिसन उफाडे व्दितीय क्रमांक - साक्षी उध्दवराव कराड तृतीय क्रमांक - अंजली जालिंदर शिंदे ७) विज्ञान व तंत्रज्ञान यामधील नवसंकल्पना प्रथम क्रमांक- बलभिम महाविद्यालय, बीड व्दितीय क्रमांक - न्यु इरा पब्लिक स्कूल, गेवराई, जि. बीड तृतीय क्रमांक- स्वा. सावरकर उच्च माध्यमिक विद्यालय, बीड



बीडः राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार राज्याचे उपमुख्यमंत्री झाल्याबद्दल ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष कल्याण आखाडे यांनी संतशिरोमणी सावता महाराजांची मुर्ती, पगडी व शेला देऊन अभिनंदन केल

माणसाने केली काशी

रस्त्यासव रंडकी केली कुणी गावची पांद
आड बुजता चिरेबंदी व्याकुळ झाली नांद
।।१।।

ओढा झाला रडवा अस्तित्व त्याचे शोधू कुठे
कोसळता जांभूळझाड पाखरांचा जीव तुटे
।।२।।

कारे,बोरे रूप न्यारे निसर्गाची खुली व्दारे
व्यथा धरेची सत्ता ऐकेना स्वार्थी जंतू सारे
।।३।।

कळसाचे दु:ख दाटले परी कळेना कसे
बुरूजाचा तटही यंत्राच्या नयनात बसे
।।४।।

म्हणे कलिचे उलटे वारे आकरित कारे
मंगळावरती चंगळ कवेत चंद्र,तारे
।।५।।

तुकोबाचे सगेसोयरे झाले वैकुंठवासी
प्रगतीच्या नावाखाली माणसाने केली काशी
।।६।।

इंद्रजीत पाटील
मो.नं.-८००७७८९६१०

पार्थ पवार यांची डॉ.योगेश क्षीरसागर यांनी घेतली भेट

बीड (प्रतिनिधी)दि.६ : मुंबई येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवा नेते पार्थ अजित पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी सदिच्छा भेट घेतली.पार्थ पवार यांनी बीड विधानसभा निवडणुकीबाबत चर्चा केली. तसेच, पक्षाच्या कामाची माहिती जाणून घेतली. यावेळी पार्थ पवार यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी माजी नगरसेवक रविंद्र कदम, नवगण शिक्षण संस्थेचे संचालक आमेर सिद्दीकी, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष शुभम कातांगळे उपस्थित होते.

एकलव्य रेसिडेंशियल पब्लिक स्कुलमध्ये प्रवेशासाठी आवाहन

बीड, दिनांक ०६ : इंग्रजी माध्यमाच्या एकलव्य रेसिडेंशियल पब्लिक स्कुलमध्ये प्रवेशासाठी रविवार, २३ फेब्रुवारी २०२५ रोजी आयोजित स्पर्धा परीक्षा होणार आहे. यासाठी विहित नमुन्यातील अर्ज संबंधित शासकीय आश्रमशाळेतील मुख्याध्यापक किंवा प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांचेकडे विनामुल्य उपलब्ध आहेत. सदर अर्ज २५ जानेवारी, २०२५ पर्यंत संबंधित प्रकल्प कार्यालयाकडे मुख्याध्यापकांमार्फत सादर करावेत, असे आवाहन छत्रपती संभाजी नगरच्या आदिवासी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाच्या प्रकल्प अधिकारी चेतना मोरे यांनी केले आहे.

प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, धारणी, पांढरकवडा, किनवट, अकोला, छत्रपती संभाजीनगर, पुसद, कळमनुरी यांच्या कार्यक्षेत्रात असलेल्या १२ जिल्ह्यातील सर्व शासकीय व अनुदानित आश्रमशाळा जिल्हा परिषद, नगरपालिका व महानगरपालिका प्राथमिक व माध्यमिक शाळा, सर्व शासन मान्य अनुदानित प्राथमिक व माध्यमिक शाळेतील सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात इयत्ता ५ वी, ६ वी, ७ वी व ८ वी मध्ये शिकत असलेल्या अनुसूचित, आदिम जमातीचे विद्यार्थी या स्पर्धा परीक्षेसाठी पात्र राहातील. नमूद सर्व शाळेतील मुख्याध्यापक यांनी प्रवेश परीक्षेचे आवेदन पत्र विद्यार्थ्यांकडून भरुन घेऊन प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाकडे मुदतीत सादर करावेत, असे प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळवले आहे.

भारताच्या तंत्रज्ञान विषयक प्रगतीचा प्रेरणादायी अनुभव

अग्निपंख हे डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांचे आत्मचरित्र असून स्वातंत्र्यानंतरच्या काळात भारताने तंत्रज्ञान विषयक क्षेत्रात केलेली भरीव कामगिरी यात वर्णन केली आहे. हे केवळ एक आत्मचरित्र नसून यात कलाम यांचे देशप्रेम, विज्ञाननिष्ठा, कामाप्रती असणारी समर्पण भावना, कुटुंबाविषयीचे असणारे प्रेम आणि सहकार्यांविषयी असणारा अतूट विश्वास यात वर्णन केला आहे. या आत्मचरित्रात त्यांनी आपले वैयक्तिक आयुष्य व व्यावसायिक संघर्ष यांचा मेळ घालत अग्नी, आकाश, पृथ्वी, नाग आणि त्रिशूल या क्षेपणास्त्रांच्या निर्मितीत आलेल्या अडचणी व त्यांची केलेली यशस्वी चाचणी याचा प्रेरणादायी प्रवास वाचकांपुढे अगदी जशाच्या तसा प्रामाणिकपणे मांडला आहे. तमिळनाडूमधील रामेश्वर या छोट्या धर्मक्षेत्री एका अशिक्षित व मध्यमवर्गीय कुटुंबात १९३१ मध्ये डॉ. कलाम यांचा जन्म झाला. त्यांचे वडील जैनुलबदीन हे व्यवसायाने नावाडी होते. रामेश्वरात असणा–या मुसलमान आणि हिंदू कुटुंबामुळे त्यांची जडणघडण राष्ट्रभक्तीला पोषक झाली. देशप्रेम त्यांच्यातून ओतप्रत वाहत होते. त्यांच्या वडिलांची व पक्षी लक्ष्मणशास्त्री यांच्या अतूट मैत्रीमुळे लहानपणापासूनच त्यांच्या मनात राष्ट्रभक्तीची बीजे रुजली गेली. त्यांच्या बाल्यअवस्थेत समसूद्दीन या दूरच्या भावाचा त्यांच्यावर विशेष प्रभाव होता. रामेश्वर मधील वर्तमानपत्राचा तो वितरक होता. त्यामुळे कलाम यांना वाचण्याची गोडी लागण्याचे हे प्रभावी माध्यम होते. चिंचोके विकणे, वर्तमानपत्र वाटणे या गोष्टींमुळे बालपणापासूनच त्यांना कष्टाच्या कमाईचे महत्व समजले. कलाम यांच्या सुसंस्कारित घराबरोबरच त्यांच्या आजूबाजूचे असणारे वातावरण त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण होण्यास महत्वपूर्ण ठरले. जीवनातील सगळे दिवस सारखे नसतात. आयुष्यात संयम हा खूप महत्त्वाचा असतो हे सांगताना ते म्हणतात, येणा–या सर्व दिवसांसाठी तयारीत रहा, त्यांना सारखेच सामोरे जा. जेव्हा ऐरण होशील तेव्हा घाव सोस अनब हातोडा होशील तेव्हा घाव घाल या त्यांच्या ओळी वाचकांना प्रेरणा देऊन जातात. त्यामुळे हे आत्मचरित्र तरुणांना एक मार्गदर्शक दीपस्तंभ ठरेल अशी खात्री वाटते. आयुष्यात दृढ इच्छाशक्ती असेल तर आपल्या मनातली गोष्ट आपल्याला मिळतेच हे सांगताना ते म्हणतात, हवाई दलाची मुलाखत दिल्यानंतर जेव्हा मला नाकारण्यात आले, तेव्हा त्यांचे गुरु स्वामी शिवानंद त्यांना म्हणाले, हृदयापासून आत्म्यापासून एखादी इच्छा उत्पन्न झाली असेल, ती जर तीव्र आणि पवित्र असेल, तिचा मनाला ध्यास लागला असेल तर अशी इच्छा ही पूर्ण होतेच. काळाच्या पोटात काय दडले आहे हे कुणालाही माहीत नसते. हवाई दलात नाकारल्यामुळे नियतीने अधिक चांगले काहीतरी आपल्यासाठी योजले असेल पण त्याचा आपण शोध घेतला पाहिजे. नियतीने मुद्दामच अडचणी आणून तुझा रोखला ते तुझ्या नशिबात आहे ते देण्यासाठी.असा मोलाचा सल्ला त्यांच्या गुरुंनी त्यावेळी त्यांना दिला व संयम ठेवायला सांगितले. प्रोफेसर सुधाकर हे कलाम यांच्या पेलोड तयार करायचा प्रयोगशाळेतील सहकारी होते. एका उड्डाणासाठी ते सोडियम आणि थर्माइडचे मिश्रण सावकाश योग्य त्या जागी भरत होते. हवेत उष्मा असल्याने सुधाकर यांच्या कपाळावरचा घामाचा एक थेंब त्या मिश्रणावर पडला अनब अचानक स्पोट झाला. तेव्हा क्षणार्धात खोलीने पेठ घेतला तेव्हा सुधाकर यांनी प्रसंगावधान राखून आपल्या दोन्ही मुलींनी प्रहार करत खिडकीची काच फोडली आणि कलम यांना खिडकीबाहेर फेकून देत स्वतःही उडी घेतली. त्यांची रक्ताळलेली हात पाहून कलाम भारावून गेले. हा प्रसंग वाचल्यानंतर शास्त्रज्ञाचे कामही किती जोखमेचे असते याची प्रचिती येते. संरक्षण मंत्री श्री. आर. वेंकटरमण यांना एका प्रकल्पाचा आराखडा सादर करण्यासाठी कलाम त्यांच्याकडे गेले असता त्यांना अचानक भावाच्या मुलीचे म्हणजे जमिलाचे लग्न त्याच दिवशी असल्याचे आठवले. पण तेव्हा खूप उशीर झाला होता. कारण मद्रासचे विमान पकडून संध्याकाळी तिथे पोचले असते तरी मद्रास आणि मदुराई मध्ये विमानसेवा उपलब्ध नव्हती. तेथून रेल्वेने ते पोहोचू शकणार नव्हते. त्यामुळे त्यांच्या मनात कालवा कालव होत होती. आपण तिच्या लग्नात पोचू न शकल्याची खंत त्यांना वाटत होती. अशा अवस्थेतच त्यांनी संरक्षण मंत्री वेंकटरमण यांना प्रकल्पाचा आराखडा सादर कला व तो त्यांनी मंजुरीही केला. सर्वांचा आनंद गगनात मावत नव्हता. अशा वेळी त्यांना इतरांकडून कलाम यांच्या घरी लग्न असल्याचे समजले. तेव्हा त्यांनी मद्रास ते मदुराई त्यांना हेलिकॉप्टरने नेण्याची व्यवस्था केली. तेव्हा ते लग्नाला वेळेत पोहचू शकले. या उदाहरणावरून शास्त्रज्ञ ध्येयाने किती पछाडलेले असतात व राष्ट्राच्या उन्नतीसाठी ते किती समर्पण करतात हे यावरून लक्षात येते. कलाम यांना नेहमी पाठिंबा देणारे त्यांचे मेहुणे अचानक गेले. ज्या बहिणीने त्यांच्या शिक्षणासाठी बांगड्या व अंगठ्या गहाण ठेवल्या होत्या. ती बहीण आता विधवा झाली होती. तिचे लहान लेकरू पोरके झाले होते. त्या धक्क्याने काही काळातच वडीलही गेले. तेव्हा आई एकाकी पडली. त्यांच्या आईला त्यांच्यापाशी येता येत नव्हते आणि कलाम यांना गावाला तिच्याजवळ राहता येत नव्हते. आशा दुधा मनस्थितीत असताना कलाम यांनी आपली कर्तव्य पार पाडत राष्ट्र उभारणीच्या कामाला महत्त्व दिले. त्यानंतर काही कालावधीतच त्यांची आई गेली. तेव्हा आपण तिच्याजवळ राहू नसल्याची खंत त्यांच्या मनात कायम राहिली. परंतु मातृभूमीच्या रक्षणार्थ तिच्या सेवेला नेहमी तत्पर असल्याचा अभिमानही त्यांच्या मनात कायम जाणवत होता. देश सेवेसाठी त्यांनी केलेला त्याग पाहून भारत सरकारने त्यांना भारतरत्न हा सर्वोच्च नागरी सन्मान देऊन त्यांच्या कार्याचा गौरव केला. पुणे येथील नावाजलेल्या राजहंस प्रकाशनने या पुस्तकाची साजेशी बांधणी केली आहे. पुस्तकाची गुणवत्ता आणि पानांचा दर्जा त्यांनी केलेल्या मेहनतीची साक्ष देतो. अरुण तिवारी यांनी सुंदर शब्दात हे आत्मचरित्र शब्दबद्ध केले आहे. प्रास्ताविकेतून त्यांनी या पुस्तकाची पार्श्वभूमी मांडली आहे. आपल्या ग्रंथालयात असायलाच हवे असे सुंदर प्रेरणादायी आत्मचरित्र आपण जरूर खरेदी करावे.



पारध समाजाच्या व्यथा मांडणारे नाटक : पारध

६३ वी महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेतील दिनांक ०५/१२/२०२४ रोजी बजाज ऑटो कला आणि क्रीडा विभाग वाळूज निर्मित ,अरविंद लिमये लिखित व बबन राऊत दिग्दर्शित पारध हे दोन अंकी मराठी नाटक सादर झाले.

पारध या शब्दाचा अर्थ पारधी असा होऊ शकतो. नाटकाचे कथानक हे पारधी समाजावर आधारित होते. ज्या समाजाकडे पोलीस व इतर लोक गुन्हेगार, चोर ,दरोडेखोर म्हणून बघतात त्या समाजाची कथा व व्यथा या नाटकात मांडण्यात आली. एका आमदाराच्या नातेवाईकांच्या घरी चोरी हो. चोर पकडण्यासाठी पोलिसांवर दबाव असतोपरंतु खरे गुन्हेगार पोलिसांना सापडत नाही म्हणून पोलीस चोर सोडून संन्यासाला फाशी देणे. या म्हणीप्रमाणे पोलीस एका निरापराध पारधी तरुणाला व त्याच्या आजोबला जेलमध्ये टाकतात.त्याला सोडवण्यासाठी त्याची बायको येते, तर तिच्यावर अत्याचार करतात. पारधी महिलांना अतिशय वाईट वागणुक दिली जाते, याबाबत ती महिला तक्रार करते तर ती तक्रार मागे घेण्यासाठी तिच्यावर दबाव आणला जातो. तू तक्रार मागे घेतली तर तूझ्या नव-याला व सार्सयाला सोडून देऊ असे सांगतात. ती बिचारी पोलिसांवर विश्वास ठेवून तक्रार मागे घेते तिचा नवरा व सासरा घरी येतात पण पुन्हा पोलीस त्यांना घेऊन जातात व त्यांना जीवे मारतात. नाटकाचे कथानक अतिशय गंभीर असल्याने प्रेक्षकांना भावूक करून टाकणारे होते. जयश्री या पात्राच्या अभिनयाने प्रेक्षकांच्या डोळ्यातून पाणी काढले खरोखरच जयश्री या पत्राचा अभिनय खूप उत्तम होता. परंतु नाटकात काही चुकाही पाहायला मिळाल्या जसे की, एखादे पात्र रंगमंचावरून वरून बाहेर गेल्यानंतर प्रेक्षकांना दिसायला नको.परंतु नाटकातील नेपथ्य मध्ये लावलेल्या झोपड्यातून बाहेर गेलेले पात्र प्रेक्षकांना दिसत होते. रंगमंचावर प्रवेश घेताना काही पात्रांनी घाई केली किंवा चुकीचे प्रवेश घेतले असे निदर्शनास आले. एका अंकात, एक प्रवेश संपला की दुसरा प्रवेश चालू होण्यासाठी काही सेकंद रंगमंचावर अंधार असावा,परंतु अनेकदा अंधार हा जास्त वेळ राहिला. नाटकात काही पात्रांनी शिवीगाळ पण केली अपशब्द वापरले ते टाळणे दिग्दर्शकाला शक्य होते. नाटकाचे नेपथ्य उत्तमरीत्या मांडण्यात आले, रंगभूषा व वेशभूषा नाटकाला साजेशी होती. प्रकाश योजना सांभाळण्यात यश आलेले दिसले नाही,सादरीकरण उत्तम झाले.

नाटकाचे कथानक व सादरीकरण उत्तम असल्याने प्रेक्षकांना नाटक भावले.

नाट्य समीक्षक
उल्हास सुधीर देशपांडे
छत्रपती संभाजीनगर

ग्रामीण कवी श्रीराम घडे यांची भारतीय साहित्य व सांस्कृतिक मंचाच्या महाराष्ट्र राज्य समन्वयक पदी निवड

प्रतिनिधि – भारत कवितके ग्रामीण हास्य कवी म्हणून प्रसिद्ध असणारे ग्रामीण कवी श्रीराम विध्यासागर घडे यांची भारतीय साहित्य व सांस्कृतिक मंचाच्या *भारतीय साहित्य व सांस्कृतिक मंच च्या ‘महाराष्ट्र राज्य समन्वयक‘ पदी नुकतीच निवडकरण्यात आली आहे. सविस्तर वृत्त असे की, काव्यक्षेत्राची तसेच शेती मातीची जाण असणारे ,शेतकरी पुत्र ग्रामीण भागातून शहरात नोकरीच्या निमित्ताने शहरात येऊन आपला सांस्कृतिक वसा आणि शेतक–याची व्यथा मांडणारे ,एकदम सोप्या शब्दात सर्वांना आपलेसे करणारे आणि आपल्या काव्यातून श्रोत्यांना खळखळून हसवणारे ग्रामीण हास्य कवी अशी महाराष्ट्र भर ओळख निर्माण करणारे ग्रामीण कवी , गीतकार, निर्माता अशा अनेक भूमिका निभावणारे तसेच स्वतः च्या आणि कवी आणि कवयित्री यांच्या कवितेला संगीत बद्ध करून सवंचे मनोरंजन करणारे कवी श्रीराम घडे सर यांची साहित्य कला, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रातील आवड पाहून, साहित्य क्षेत्रातीलविविध समस्या सोडवण्यासाठी , समूहासाठी वेळोवेळी दिलेले योगदान या बाबींचा विचार करून त्यांची भारतीय साहित्य व सांस्कृतिक मंच च्या ‘महाराष्ट्र राज्य समन्वयक‘ पदी निवड झाल्याबद्दल श्री . श्रीराम घडे यांचे मनपूर्वक अभिनंदन भारतीय साहित्य व सांस्कृतिक मंच च्या ‘महाराष्ट्र राज्य समन्वयक‘ पदी निवड नुकतीच निवड करण्यात आली आहे. या निवडीबद्दल संघटनेचे अध्यक्ष मा .विशाल सिरसट, उपाध्यक्ष विजय जायभाये, कार्याध्यक्षा शिल्पा मुसळे,,राष्ट्रीय सचिव बारकू आघाव, सहसचिव योगेश हरणे आदीसह अनेकांनी अभिनंदन केले.



भारतीय साहित्य व सांस्कृतिक मंच

मा. विशाल नामदेव सिरसट (राष्ट्रीय अध्यक्ष)
मा. विजय विष्णू जायभाये (राष्ट्रीय उपाध्यक्ष)
मा. शिल्पा श्रीकांत मुसळे (राष्ट्रीय कार्याध्यक्षा)

दि.०४/१२/२०२४

नियुक्ती पत्र

मा.प्रशांत गोरे
यांना,सस्नेह नमस्कार
आपली साहित्य, कला, सामाजिक, शैक्षणिक तथा सांस्कृतिक क्षेत्रातील कामाची आवड पाहून, साहित्य व सांस्कृतिक क्षेत्रातील विविध समस्या सोडविण्याबाबत वेळोवेळी दिलेल्या योगदानाबद्दल आम्हांस अभिमान वाटतो.म्हणून आपणांस कळविण्यात आनंद होतो की, भारतीय साहित्य व सांस्कृतिक मंच या राष्ट्रीय संघटनेच्या

महाराष्ट्र राज्य समन्वयक

पदी आपली नियुक्ती करीत आहोत. आपल्या कुशल नेतृत्वाने शुभ कार्याचा जागर असाच अविरतपणे तेवत राहावा, अशी आशा करून आपण ही जबाबदारी घ्यावी आणि आपल्या साहित्य व सांस्कृतिक योगदानास सहकार्य करून कार्याचा शुभारंभ करावा. पुढील साहित्यिक व सांस्कृतिक वाटचालीस मनःपुर्वक शुभेच्छा!

मा. विशाल नामदेव सिरसट (राष्ट्रीय अध्यक्ष)
मा. विजय विष्णू जायभाये (राष्ट्रीय उपाध्यक्ष)

मा. बारकू आघाव (राष्ट्रीय सचिव)
मा. चैताली कापसे (महिलाध्यक्षा)
मा. छाया देसले (कोषाध्यक्षा)
प्रदेश कार्याध्यक्ष

जिल्हास्तरीय दिव्यांग क्रीडा महोत्सव

पनवेल/ प्रतिनिधी जगभरात ३ डिसेंबर रोजी जागतिक दिव्यांग दिन साजरा करण्यात येतो. दिनांक ०३ /१२ /२०२४ रोजी दिव्यांग दिनाचे औचित्य साधून समाज कल्याण विभाग रायगड अलिबाग व डॉ. नंदकुमार मारुती जाधव फाउंडेशन संचालित बौद्धिकब अक्षम मुलांची विशेष शाळा यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय दिव्यांग क्रीडा स्पर्धांचे आयोजन केले होते. या क्रीडा स्पर्धेच्या माध्यमातून दिव्यांगाना प्रोत्साहन मिळावे व विद्यार्थ्यांमधील क्रीडा गुणांना वाव मिळावा याकरता दिव्यांगांच्या क्रीडा स्पर्धांचे आयोजन केले होते. जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा पनवेल मधील बाठिया क्रीडांगणात मोठ्या उत्साहात पार पडल्या .या क्रीडा स्पर्धेत जिल्ह्यातील १६ विशेष शाळांनी सहभाग घेतला होता.या क्रीडा स्पर्धेत वयोगटानुसार धावणे, गोळा फेक ,सॉफ्टबॉल थ्रो ,उभे राहून लांब उडी, लांब उडी बादलीत बॉल टाकने, २५ मीटर चालणे या स्पर्धा बौद्धिकअक्षम ,कर्णबधिर ,बहुविकलांग या प्रवर्गामध्ये घेण्यात आल्या. या कार्यक्रमास रायगड जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. सत्यजित बडे साहेब यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढविली.जिल्हा समाज कल्याण अधिकारी श्री. श्यामराव कदम साहेब ,सहाय्यक सल्लागार दिव्यांग कल्याण कक्ष रा.जि. प अलिबाग श्री. साईनाथ पवार साहेब, समाज कल्याण कार्यालयीन अधीक्षक सौ. अंजली मंत्री मॅडम, प्रशासन अधिकारी दिव्यांग शाखा रा.जि.प अलिबाग श्री. प्रशांत काळे साहेब, सहाय्यक लेखा अधिकारी समाज कल्याण विभाग रा.जि.प अलिबाग चे श्री.अमित शेवाळे, प्राचार्य के.आ.बाठिया विद्यालय तथा अध्यक्ष जिल्हा मुख्याध्यापक संघ श्री. बी.एस माळी सर, गटविकास अधीक्षक पंचायत समिती, पनवेल चे श्री. समीर वाटारकर साहेब, मुख्याध्यापक आगरी शिक्षण संस्था तथा म.रा माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ चे श्री.पंकज भगत साहेब, व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ. नंदकुमार मारुती जाधव फाउंडेशन चे डॉ.नंदकुमार मारुती जाधव साहेब, डॉ.नं. मा .जाधवब फाउंडेशनचे श्री. सुरेश जाधव साहेब, डॉ.नंदकुमार मारुती जाधव फाउंडेशनचे खजिनदार श्री. अतुल वाणी साहेब , डॉ. नंदकुमार मारुती जाधव शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.श्रेया जाधव यांच्या व इतर मान्यवरांच्या तसेच सर्व शाळांचे ट्रस्टी व मुख्याध्यापिका यांच्या उपस्थितीत क्रीडा स्पर्धाचे उद्घाटन मशाल प्रज्वलित करून करण्यात आले.प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत धावणे या स्पर्धेला झेंडा दाखवून क्रीडा महोत्सवात सुरुवात केली. यानंतर दीप प्रज्वलन करून सर्व पाहुण्यांनी क्रीडा स्पर्धेच्या सोहळ्याचे उद्घाटन केले.उपस्थित मान्यवरांचे शाल,श्रीफळ , सन्मान चिन्ह व पुष्पगुच्छ देऊन आयोजकांनी स्वागत केले.डॉ. नंदकुमार मारुती जाधव फाउंडेशन चे व्यवस्थापकीय विश्वस्त श्री. नंदकुमार जाधव साहेब यांनी प्रास्ताविकामध्ये कार्यक्रमाचे स्वरूप, उद्देश सांगत या सोहळ्या मागची आयोजकांची भूमिका मांडली. त्यानंतर अतिरिक्त मुख्य अधिकारी रा.जि.प चे श्री .सत्यजित बडे साहेब यांनी क्रीडा महोत्सवास शुभेच्छा देत डॉ. नंदकुमार मारुती जाधव फाउंडेशनच्या सुंदर आयोजनाचे कौतुक केले .जिल्हा समाज कल्याण अधिकारी डॉक्टर शामराव कदम साहेबांनी ही क्रीडा महोत्सवात शुभेच्छा दिल्या. सर्वांचे स्वागत करीत सुंदर आयोजनासाठी डॉ.नं.मा जाधव फाउंडेशनचे कौतुक केले. सहाय्यक सल्लागार दिव्यांग कल्याण कक्ष रा.जि.प अलिबागची चे श्री .साईनाथ पवार साहेब यांनी क्रीडा स्पर्धे साठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करून शुभेच्छा दिल्या . त्यानंतर दिवसभर दिव्यांग प्रवर्गातील विविध वयोगटातील स्पर्धा मोठा उत्साहात पार पडल्या. दुपार सत्रात युनिटी स्मॉल फायनान्स बँक प्लॅनिंग अँड स्ट्रॅटर्जीच्या मॅनेजर विणा सदाफुले मॅडम व त्यांच्या सहर्कायांचे स्वागत करण्यात आले . बंठिया, महात्मा व केएलई विद्यालय च्या क्रीडा शिक्षकांनी पंच म्हणून अतिशय चांगल्या प्रकारे क्रीडा स्पर्धाचे काम पाहिले . स्पर्धेत विजयी विदयार्थ्यांना अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक देण्यात आहे. विजेत्यांना ट्रॉफी व सर्टिफिकेट देऊन गौरविण्यात आले . या कार्यक्रमात नाश्ता , सरबत, जेवण वैद्यकीय सेवा यांचे व्यवस्थित आयोजन करण्यात आले होते. संपूर्ण कार्यक्रमात दिव्यांग विद्यार्थ्यांची संपूर्ण काळजी घेण्यात आली. राष्ट्रीताने क्रीडा महोत्सवाची सांगता झाली . समजकल्याण विभाग रायगड व डॉ. नंदकुमार मारुती जाधव फाउंडेशन . त्यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेच्या यशस्वी आयोजनाचे समाजातील सर्व स्तरातून कौतुक करण्यात आहे.

शाळा बंद : शिक्षकही तेवढेच जबाबदार

नुकताच एका कामानिमित्त गावातील माझ्या बाबांच्या महानगर पालिकेच्या सरकारी शाळेत गेलो होतो. शनिवार असल्याकारणाने मुलांची शाळा सकाळची होती आणि शाळेतील क्रीडांगणावर त्यांची पि.टी. सुरू होती. पि. टी. संपली व मुले वर्गात जाऊ लागली. मी माझे काम ज्या शिक्षकाशी होते त्या शिक्षकांकडे गेलो परंतु मुख्यध्यापिकाच न आल्यामुळे माझे काम थांबले होते. त्या वेळात मी थोडे शाळेचे व मुलांचे निरीक्षण करतच होतो, की एक मुलगा शाळा सुरू होऊनही शाळेतल्या आत असलेल्या दुचाकी वर बसला कदाचित त्याचीच असेल ती आणि गेटच्या बाहेर गेला. नववी दहावी मध्ये असेल तो. मी तिथे उपस्थित असलेल्या प्राथमिकच्या शिक्षकांना प्रश्न केला की हा मुलगा शाळा सुरू असतानाही गाडी बाहेर घेऊन कसा गेला, तर अगोदर त्यांनी दुर्लक्षच केले, पण परत एकदा विचारल्यावर असे सांगण्यात आले की ङ्गतो मुलगा हायस्कूलचा आहे, त्यांना आम्ही काही बोलू शकत नाहीङ्घ त्यावर मी त्यांना काही बोललो नाही परंतु माझ्या मनात सतत एकच प्रश्न येत होता की या शाळेत काही शिस्त आहे की नाही? शिक्षक खरच मुलांकडे लक्ष देतात..? प्राथमिक शिक्षक आहे म्हणून काय झालं तो तुमच्याच शाळेतील विद्यार्थी तुम्ही त्याला काही का बोलू शकत नाही. त्याच्या शिक्षकांकडे आणि पालकांना याबाबत का सांगू शकत नाही.जवळजवळ मला तिथे जाऊन दीड ते दोन तास झाले तरी मुख्याध्यापिका अजूनही आल्या नव्हत्या. मी सहजच त्या मॅडमला प्रश्न केला की, ङ्गसाडेसातची शाळा असूनही आता नऊ वाजत आहेत तर या मॅडम अजून कशा काय आल्या नाहीत.ङ्घ त्यांनी सरळ उत्तर दिले की, ङ्गत्यांना काही काम आले असेलङ्घ. हे ऐकून माझे मन सतत मला विचारत होते की म्हणूनच पालक आपल्या मुलांना जिल्हा परिषदेच्या शाळेत टाकत नसेल, म्हणून सरकारी शाळा आज बंद होत असतील, कदाचित याच कारणामुळे जिल्हा परिषदेच्या शाळेतील मुलांची संख्या कमी होत असेल...?

सवा नऊ वाजता मुख्यध्यापिका आल्या. मी माझे काम त्यांना सांगितले तर त्यांनी ठीक आहे म्हणत आवश्यक कागदपत्रे तपासायला सुरुवात केली परंतु माझे मन सतत त्या विद्यार्थ्यांच्या येणा–या आवाजाकडे आणि त्यांच्या भविष्यासोबत होणा–या खेळाकडे विचार करायला लावत होते. त्या मॅडमशी बोलता बोलता कळले की त्या शाळेत प्राथमिक ला फक्त दोनच शिक्षक आहेत वर्ग आहे चार आणि शिक्षक फक्त दोनच आणि वर्तमानपत्रात वाचलेली ही शाळेविषयाची बातमी आज प्रत्यक्ष डोळ्यासमोर मी अनुभवत होतो. या सरकारची चूक आहे हे तर मान्यच आहे.परंतु फक्त सरकारला दोष देऊन कसे चालणार आहे.तेव्हा माझ्या मनात दोनच प्रश्नः तो मुलगा गाडी घेऊन गेला कसा आणि मुख्याध्यापिका मॅडमला एवढा उशीर का झाला? जर तुम्हाला माहिती आहे की आपण फक्त दोघीच शिक्षिका आहोत तर वेळेवर येऊन वर्ग सांभाळण्यावर आणि विद्यार्थ्यांच्या शिकवणी कडे लक्ष द्यायला हवे असे मला तरी वाटते.

अर्ध्या तासांनी मला पुन्हा कार्यालयात बोलवण्यात आले आणि सांगितले की ङ्गआज तुमचे काम होऊ शकत नाही ङ्घ हे ऐकताच पायातली आग मस्तकात गेली. ठीक आहे येवढ्या वेळ थांबूनही माझं काम नाही झालं पण आता मात्र माझ्या मनातले सर्व प्रश्न थोड्या रागानेच बाहेर पडू लागले आणि थोड्या मोठ्या आवाजात विचारले की मॅडम तुमचा शाळेत येण्याचा वेळ काय? त्यावर ते म्हणाले, ङ्गतुम्हाला त्याच्याशी काय ! हे ऐकल्यावर तर हे फक्त पगारासाठी येतात की काय असेच वाटले ....! माझ्या मते शिक्षक हे समाजातील सर्वांत महत्त्वाच पात्र आहे. जरी त्याला दोन पैसे कमी भेटले तरी चालेल परंतु त्याने त्याचे काम प्रामाणिकपणे केले पाहिजे. जर शिक्षकच उशिरा येणार तर विद्यार्थी तरी कुठे वेळेवर येणार आहेत. शिक्षकासाठी शिकवणं ही फक्त एक नोकरी नसून ते त्याचे कर्तव्य आहे. शिक्षकांकडून होणारी कुठलीही छोटी चूक ही संपूर्ण पिढीला हानी पोहोचवू शकते.

सरकार सरकारी शाळेत मोफत आहार तर देतय, वही पुस्तका तर देतेय, पण शिक्षणाच काय...? कदाचित याच कारणांमुळे आज मराठी शाळा बंद होण्याच्या वाटेवर चालल्या आहेत, याचमुळे सरकारी शाळेतील विद्यार्थ्यांची पटसंख्या कमी होत आहे. आणि म्हणूनच पालकांचा सरकारी शाळेवरील विश्वास तुटलेला दिसतोय. यामध्ये फक्त सरकार जबाबदार नाही तर सरकारी शिक्षकही तेवढेच जबाबदार आहेत.

लेखकः वंश कांता संजय काळे (नागपूर) ८७६७८७०८२१

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे उत्कृष्ठ साहित्य रत्न पुरस्कार कवी, मनोहर पवार यांना जाहीर

चिखली) येथिल रहिवासी शाहीर कवी, लेखक, मनोहर पवार यांना यंदाचा उत्कृष्ट साहित्या करीता राज्यस्तरीय लोकशाहीर अण्णाभाऊ साठे साहित्यरत्न पुरस्कार निवड समितीचे मुख्य संयोजक सचिन खंदारे यांनी केली असून स्व . मधुकर खंदारे स्मृतीप्रित्यर्थ आणि सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्ताने व समाज भूषण अर्जुन गवई यांच्या वाढदिवसाच्या पर्वणीवर सदर राज्यस्तरीय पुरस्काराचे आयोजन करण्यात आले असून विविध क्षेत्रात विशेष कार्य करणारे व्यक्ती यांना राज्यस्तरीय पुरस्कारने मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार वितरण करण्यात कवी, शाहीर मनोहर पवार केळवदकर यांनी साहित्य शाहीरी कला काव्य क्षेत्रात मोलाचे योगदान दिले असून महाराष्ट्रभर त्यांचे कार्य सुरु आहे . तसेच त्यांना शासनाचे संस्थांचे विविध पुरस्कार प्राप्त झाले असून त्यांचे कार्य अविरत सुरु असून सामाजिक कार्य, साहित्यिक चळवळ, तसेच कलाक्षेत्रात त्यांनी विविध जिल्हयात सहभाग नोंदविला असून ते विविध सामाजिक संघटन, पदाधिकारी आहेत . कवी मनोहर पवार यांनीअनेक काव्य, पोवाडे, अभंग, लावणी, शाहीरी फटके आदी काव्यप्रकार लिहीले असून ते विविध प्रसार माध्यमात सातत्याने लिखाण करीत असून अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात घूमान, पंजाब प्रांतात सहभाग नोंदविला आहे . तसेच चित्रपट नाट्य अभिनय करीत चित्रपट महामंडाळाचे सदस्य असून शासनाचे मानधन प्राप्त शाहीर कलावंत आहेत .



|| श्री गजानन महाराज प्रसन्न ||
श्री संत वासुदेव महाराज ज्ञानपीठ संस्था अकोट, रजि.नं.ई-४४८ अंतर्गत
मध्यस्थी वधू-वर सुचक मंडळ-अकोट, पुणे-शाखा आयोजित
॥ विदर्भ मराठा समाज ॥
राज्यस्तरीय उपवर युवक-युवती परिचय व पालक मेळावा
रविवार दि.०८ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी १०.३० वा. वेळेत सुरु होईल.
❋ कार्यक्रमाचे अध्यक्ष ❋
मा.श्री.बळीराम पुंडलिक पाटील (मा.धर्मदाय आयुक्त)
❋ उद्घाटक ❋
ह.भ.प.श्री.वासुदेवराव म.महल्ले (अध्यक्ष-श्री संत वासुदेव महाराज ज्ञानपिठ संस्था, अकोट)
मा.श्री.बाळासाहेब फोकमारे (अध्यक्ष-श्री संत वासुदेव म.मध्यस्थी वधू-वर सू.मं, अकोट)
ह.भ.प.श्री.पुरुषोत्तम महाराज हिंगणकर (चिखली, पुणे)
ह.भ.प.श्री.बळीराम म.मेहुणकर (आळंदी देवाची, पुणे)
❋ प्रमुख पाहुणे ❋
मा.श्री.मधुकरराव वारुळकर (मा.शिक्षक स.वि.पा.पारस)
मा.श्री.सुरेशजी नढे पाटील (मा.नगरसेवक पिंपरी-चिंचवड)
मा.श्री.महादेवराव डिवरे (हनुमानवाडी, पुणे.)
❋ मार्गदर्शक ❋
श्री.महादेवराव सावरकर (अध्यक्ष-मध्यस्थी वधू-वर सूचक मंडळ, पुणे शाखा)
कॅप्टन श्री.सुनिलजी गो.डोबाळे (कार्याध्यक्ष-मध्यस्थी वधू-वर सूचक मंडळ, पुणे शाखा)
❋ निमंत्रीत मान्यवर ❋
सर्व कार्यकारिणी मंडळ अकोट, श्री.बाळकृष्ण आमले, श्री.नानासाहेब वऱ्हाडे, श्री.अमित ताले, श्री.सुदामभाऊ मुंडे, श्री.ताठे गुरुजी, श्री.प्रल्हादराव लावडे, श्री.प्रकाशराव गावंडे
❋ स्वागतोत्सुक ❋
वैभव टेकाडे, रामदेव शेळके, संतोष माळी, दिपक घुमाळे, नितीन सावरकर, अनिरुध्द काळे, अतुल गावंडे, विवेक दोड, जितेंद्र संबारे, अरविंद कावरे, मनोज दगडकर, सुजित हिंगणकर
❋ सहकार्य ❋
श्री.गजेंद्र मानकर, श्री.नितेश हिंगणकर, श्री.उमेश हिंगणकर, श्री.भुषण पाचडे, श्री.श्याम वानखडे, चि.अक्षय मारोडे, चि.प्रतिक पखान, चि.गौरव कराळे.
स्थळ : श्री रेड्डी समाज मंगल कार्यालय, देहू फाटा, आळंदी देवाची.
कार्यक्रमानंतर भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे
इच्छुक उपवर युवक-युवती यांना स्वत: परिचय वाचण्यास प्राधान्य देऊन कार्यक्रम यशस्वी करण्यात मदत करावी.
सोबत येताना १० बायोडाटा कॉपी आणि नोंदणीसाठी दोन रंगीत फोटो आदान प्रदानासाठी असू द्यावे

महाराष्ट्रातील उपवर झालेल्या तरुण तरुणीना आवाहन करण्यात येत आहे कीं विदर्भ मराठा समाजाचे वधूवर परिचय भव्य राज्यस्त्रीय मेळावा रविवार दि ८/१२/२०२४ रोजी सकाळी १०:३० ते १२:३० पर्यंत रेड्डी समाज कार्यालय देहू फाटा आळंदी दे. येथे आयोजित केला आहे तरी इच्छुक तरुण तरुणीनी त्या ठिकाणी बहू सखेने परिचय देण्यासाठी यावे संत वासुदेव महाराज व संत ज्ञानेश्वर महाराज कृपेनें नक्कीच योग जुळून येतील. असे आवाहन विदर्भ मराठा वधुवर सूचक मंडळंच्या बतीने ह भ प श्री पुरुषोत्तम महाराज हिंगणकर यांनी केले आहे



|| वंदे मातरम् || || श्री काळेश्वर प्रसन्न || || भारत माता की जय ||
स्वदेशी भारत बचत गट सकुंडेमळा
श्री काळेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठान, आसू आयोजित
राज्यस्तरीय काव्य लेखन, निबंध लेखन, प्रकाशित पुस्तक व दिवाळी अंक स्पर्धा २०२४
हुतात्मा राष्ट्रबंधू राजीवभाई दिक्षीत यांची जयंती व पुण्यतिथी दिन स्वदेशी दिन म्हणून साजरा होत आहे. त्यानिमित्त राष्ट्रभक्तीवर काव्यलेखन / निबंध लेखन / प्रकाशित पुस्तक / काव्य संमेलन व दिवाळी अंक स्पर्धा घेण्यात आली होती. त्यामधील प्रथम / द्वितीय / तृतीय क्रमांकाबद्दल तथा सहभागी झाल्याबद्दल-
श्री./सौ./कु. रेखा दीक्षित, कोल्हापूर.
बालसाहित्यः- दिपज्योती, सुभाषितसंग्रह. यांना
स्वदेशी भारत सन्मान पुरस्कार - २०२४
सन्मानपूर्वक देऊन गौरविण्यात येत आहे.
अरविंद मेहता, संमेलन अध्यक्ष, ज्ये. पत्रकार, फलटण
श्रीमंत सिद्धसेनराजे निंबाळकर खर्डेकर, स्वागताध्यक्ष
विद्या सरपाते, काव्य संमेलन अध्यक्ष, पोलीस पाटील, गुंजखेड लोणार
सौजन : श्री.प्रमोद सदाशिव झांबरे, मा.चेअरमन, सातारा जिल्हा मजूर फेडरेशन

कोल्हापूर हुतात्मा राष्ट्रबंधू राजीवभाई दीक्षित याच्या जयंतीचे औचित्य साधून जेष्ठ लेखिका,कवयित्री रेखा दीक्षित यांना स्वदेशी भारत सन्मान पुरस्कार २०२४ ने सन्मानित करण्यात आले. त्यांच्या मदीपज्योतीफ्या १५१ संस्कृत सुभाषिते व त्यांचा मराठीत अर्थ लिहीलेल्या संपादीत पुस्तकाला हा पुरस्कार देण्यात आला.कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्रीमंत शिवरूपराजे उर्फ बाळराजे खर्डेकर, अध्यक्ष अरविंदभाई मेहता,पंडितराव लोहकरे,रवींद्र बेडकीहाळ, धैर्यशील देशमुख, कवी हनुमंत चांदगुडे,विद्या सरतापे, धीरेंद्रराजे खर्डेकर, जीवन इंगळे गुरूजी,रघुवीर माने-पाटील,प्रमोद झांबरे व इतर प्रमुख मान्यवरांचे हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.श्री काळेर्श्वर मंदीर, आसू येथे बहारदार काव्य संमेलनाचा कार्यक्रमही पार पडला.प्रकाश सकुंडे,वसंत सकुंडे व इतर संयोजक कमिटीने ह्या कार्यक्रमाचे सुंदर नियोजन केले.जेष्ठ लेखिका,कवयित्री रेखा दीक्षित, सेवानिवृत्त प्राचार्य यांचा पुरस्काराने सन्मान झाल्याने सर्व स्तरांतून त्यांचे अभिनंदन होत आहे.हे पुस्तक पलपब पब्लिकेशन,अहमदाबाद तर्फे प्रकाशित करण्यात आले आहे.



Dadasaheb phalke chitrapat union
Regd. No.: A.L.C./Karyasun-17/11651
Under Trade Union Act , 1926 with Government of India
Shop No. 15, Sundra Niwas, JVLR, Opp. SRPF Hospital, Jogeshwari (E), Mumbai - 400 060.
Date : 1/12/2024
नियुक्ती पत्र
प्रति,
Pramod Narsing Suryavanshi
सप्रेम नमस्कार,
आपणांस कळविण्यात आनंद होतो की, मुंबई विभागीय दादासाहेब फाळके चित्रपट युनियन
General secretary of Vasai-Virar
पदी आपली निवड करण्यात येत आहे. तसेच संघाचे ध्येय धोरणे व कार्यक्रम राबविताना समाजातील प्रत्येक घटकाला न्याय देवुन संघटना मजबूतीसाठी आपण प्रामाणिक प्रयत्न कराल अशी मी आशा बाळगतो.
आपल्या नियुक्तीबद्दल आपले हार्दिक अभिनंदन !
Website : www.dspcunion.com
Email: events@dspcunion.com
Ajit Mhamunkar
All India President
+91 8108148889

Pramod Suryavanshi
General secretary of Vasai - Virar
Dadasaheb phalke chitrapat Union
Dadasaheb phalke chitrapat Union
Ajit Mhamunkar - All India President
Father of Indian cinema
Dhundraj Govind Phalke

श्री दादासाहेब फाळके चित्रपट युनियन मध्ये सरचिटणीस पदावर नियुक्ती प्रमोद नरसिंग सूर्यवंशी यांची विरार वसई मुंबई उपनगर मधून

मुख्याधिकारी नीता अंधारे यांनी अनाधिकृत होर्डिंग्ज प्रकरणी भेदभाव करू नये

कारवाई न झाल्यास पुन्हा विद्रुपीकरण होईल ; जिल्हाधिका-यांना तक्रार :- डॉ.गणेश ढवळे

बीडः- (दि.०६)बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील वाहतुकीस अडथळा व अपघाताला निमंत्रण ठरणारे होर्डिंग्ज काढण्यात यावेत.न काढल्यास शहर विद्रुपीकरण कायद्यांतर्गत कारवाई करण्यात यावी यासाठी दि.०२.१२.२०२४ रोजी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील वाहतूकीस अडथळा व अपघाताला निमंत्रण ठरणारी अनाधिकृत होर्डिंग्ज काढण्यात यावीत म्हणून निदर्शने करून मुख्याधिकारी नगरपरीषद बीड यांना निवेदन दिले होते.त्यानंतर मुख्याधिकारी नगरपालिका बीड यांच्या आदेशाने होर्डिंग्ज काढण्यात आली.परंतु आज दि.०६ .१२.२०२४ वार शुक्रवार रोजी छत्रपती शिवाजी महाराज चौकात मुख्यमंत्री मा.देवेंद्रजी फडणवीस यांच्या मुख्यमंत्री पदी निवड झाल्याबद्दल अभिनंदनाचे होर्डिंग्ज लावण्यात आलेले दिसले ते तातडीने काढण्यात यावेत अन्यथा शहर विद्रुपीकरण कायद्यांतर्गत कारवाई करण्यात यावी अशी मागणी डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी लेखी निवेदनाद्वारे निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी व मुख्याधिकारी नगरपरीषद बीड यांना केली असुन अनाधिकृत होर्डिंग्ज प्रकरणी कारवाईत भेदभाव करण्यात येऊ नये तसेच याप्रकरणी कारवाई केली नाहीतर आणखी ईतर त्याठिकाणी होर्डिंग्ज लावतील.

संभाजी सुर्वे पुन्हा छत्रपती शिवाजी महाराज चौकाचे विद्रुपीकरण पुन्हा नको :- डॉ. गणेश ढवळे

--बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात संभाजी सुर्वे यांनी ङ्ग मी पुन्हा आलोङ्क घोषवाक्य असणारे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या मुख्यमंत्री पदी निवड झाल्याबद्दल होर्डिंग्ज लावले आहेत. मुख्यमंत्री महोदयांचे पुन्हा आल्या बद्दल अभिनंदन परंतु बीडकरांना छत्रपती शिवाजी महाराज चौकाचे पुन्हा विद्रुपीकरण नको आहे असे. आवाहन डॉ.गणेश ढवळे यांनी केले आहे.

चतुररागिनी ग्रुपचाङ्कसितारों की मेहफिल हा पचवार्षिक महोत्सव हर्ष उल्हासात संपन्न

मुंबई(प्रतिनिधी-गुरुनाथ तिरपणकर)सांस्कृतिक क्षेत्रात कार्यरत असणारा चतुररागिनी हा ग्रुप.या ग्रुपच्या माध्यमातून नुकताच कस्तुरबा हॉल,माटुंगा पश्चिम येथेङ्कसितारों की मेहफिल ङ्गहा पंचवार्षिक महोत्सव मोठ्या हर्ष उल्हासात आणि धुमधडाक्यात पार पडला.चतुररागिनी या ग्रुपच्या माध्यमातून पार पडलेल्या विविध स्पर्धेतील विजेत्यांना मुकुट आणि विजयचिन्ह देऊन गौरविण्यात आले. चतुररागिनी ग्रुप च्या अध्यक्षा सौ.शिल्पा देसाई व त्यांच्या टीमने या कार्यक्रमाची फार सुंदररित्या आखणी केली होती.उपस्थित असलेल्या चतुररागिंनी वेगवेगळ्या चित्रपट कलाकारांसारखे हुबेहुब पोशाख करुन त्यांच्या सुपरहिट गाण्यांवर ज्याप्रकारे नृत्य सादर केली की जणू सगळे फिल्मी कलाकारच स्टेजवर अवतरले आहेत.आणि ह्या सगळ्यात लक्षवेधी झाला तो म्हणजे फॅशनवॉक खूपच सुंदररित्या सादर केला त्यामुळे चित्रपट तारिकांच्या आठवणींना उजाळा मिळाला.पण हे करताना चतुररागिनींनी आलेल्या सगळ्यांचे मनोरंजन ही केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय व संजना राणे ह्या जोडीने उत्कृष्टरित्या सांभाळले,सोबतच ह्या जोडीच्या नृत्याने व इतर चतुररागिनींच्या दिलखेचक नृत्य अदाकारीने कार्यक्रमाची रंगत वाढली.जेणेकरून सितारोकी मेहफिल हे नाव पूर्णपणे सार्थकी ठरले.मराठी सिनेतारका,निवेदिका सेलेब्रेटी पूनम चांदोरकर यांनी कार्यक्रमास आवर्जून उपस्थिती तर लावलीच पण चतुररागिनी सोबत नृत्याचा आस्वादही घेतला.कार्यक्रमात सगळ्या चतुररागिनींना मिळालेली सुंदर बक्षिसे हे खास आकर्षण ठरले आणि यासाठी विशेषतः ज्वेलरी डिझायनर प्रियांका घारे सोबतच वीणा प्रभू,किरण गौर,शुभांगी घाटणेकर यांनीही स्पॉन्सरशिप देऊन कार्यक्रमाची शोभा वाढविण्यास फक्त हातभारच नाही लावला उपस्थित राहुन चतुररागिनींना मार्गदर्शन करत त्याच्यासोबत नृत्याचा आनंद लुटला.सितारोकी मेहफिल या कार्यक्रमासाठी मुंबई,ठाणे,विरार,कल्याण,पनवेल,नाशिक,अलीबाग तसेच पुण्याहून आलेल्या सगळ्या उपस्थितांनी या मजेदार आणि मनोरंजनाने कार्यक्रमाचा आनंद लुटला आणि विशेष स्वादिष्ट भोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

कांदिवली मध्ये धनगर समाज विकास मंडळा तर्फे महाराजा यशवंतराव होळकर यांच्या जयंती निमित्त विनम्र अभिवादनचा कार्यक्रम संपन्न.

भारत कवितके मुंबई कांदिवली पश्चिम. मुंबई मधील कांदिवली पश्चिम या उपनगरा मध्ये धनगर समाज विकास मंडळाच्या वतीने ३ डिसेंबर २०२४ रोजी सायंकाळी ७ वाजता कांदिवली चारकोप येथील मंडळाचे कार्याध्यक्ष सुनील भगत यांचे घरी प्लाट नंबर २४२,रुम नंबर डी ४६, सेक्टर २, गणेश मंदिर गल्ली या ठिकाणी कांदिवली मधील धनगर समाज बांधवांच्या उपस्थिती मध्ये अपराजित यौध्दा महाराजा यशवंतराव होळकर यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादनचा कार्यक्रम संपन्न झाला.सुरुवातीला महाराजा यशवंतराव होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून, दिप प्रज्वलीत करून,भंडारा लावून, विनम्र अभिवादन करण्यात आले.या प्रसंगी धनगर समाज विकास मंडळाचे प्रवक्ते , संस्थापक सदस्य, पत्रकार, साहित्यिक, गीतकार सामाजिक कार्यकर्ता भारत कवितके यांनी अपराजित यौध्दा भारताच्या स्वातंत्र्याचे प्रणेते महाराजा यशवंतराव होळकर यांच्या जीवनाबद्दल, कार्याबद्दल, माहिती सांगितली.आणि उपस्थित समाज बांधवांचे आभार मानले.अशा प्रकारचे उत्सव, जयंती, पुण्यतिथी समाजात होऊन गेलेल्या महान व्यक्ती च्या नावाने करायला हवे.असे सांगितले.या जयंती प्रसंगी भारत कवितके, जेष्ठ समाज बांधव दशरथ लाळगे, संस्थापक सदस्य आप्पासाहेब कुचेकर, मंडळाचे अध्यक्ष शिवाजी पिसे, मंडळाचे कार्याध्यक्ष सुनील भगत, मंडळाचे उपाध्यक्ष महेंद्र काळे, संस्थापक सदस्य सदानंद लाळगे सर, समाज बांधव किसन बरगडे, समाज बांधव राजेंद्र लाळगे,सौ.आशा भगत, कुमारी श्रावणी भगत व इतर समाज बांधव व भगिनी उपस्थित होते.

नाट्यचित्रपट कलावंतांचा उत्तुंग कलाविष्कार आणि स्मृती सोहळा संपन्न.

बालगंधर्व रंगमंदिरात संगीत रंगभूमी आणि नाट्य चित्रपट कलावंतांच्या उपस्थितीत ,स्व. प्रमोद मोरेश्वर दामले यांच्या स्मरणार्थ रंगला अद्वितीय स्मृती सोहळा. नाटक,चित्रपट,आणि साहित्यिक कलावंतांच्या त्रिसूत्री संघटनातून होणारे परीवर्तन, संस्कृती,परंपरा आणि लोककलेचे जतन करते. कलासंवर्धनार्थ आयुष्य वेचलेल्या स्व.प्रमोद दामले यांच्या दहाव्या स्मृतिदिनानिमित्त त्यांना अभिवादन करणारा हा अद्वितीय सोहळा आहे.कर्तव्यनिष्ठा आणि कला यांचा सुरेख संगम या सोहळ्याने साधला आहे.आणि कलावंत म्हणून जगणे हाच आनंद असे प्रतिपादन मा. राजदत्त यांनी केले. तितिक्षा इंटरनॅशनल संस्थेच्या दशकपूर्ती निमित्त आयोजित नाट्य, ,कला, साहित्य क्षेत्रातील गुणवंत कलाकारांचा स्नेहमेळावा ,पद्मभूषण मा. राजदत्त✻ (ज्येष्ठ दिग्दर्शक - चित्रपट, मालिका, माहितीपट, लघुपट आणि महानाट्य, चित्ररत्न, स्वातंत्र्य सैनिक),मा. रजनी भट (ज्येष्ठ नाट्य अभिनेत्री.), मा. दिलीप घारे,.प्रसिद्ध अभिनेते, (प्राध्यापक, नाट्य विभाग प्रमुख. सरस्वती भुवन महाविद्यालय,छत्रपती संभाजी नगर) मा. कोटा नागुची जपान, (ङ्गहॅपी सायन्सङ्क राष्ट्रीय अध्यक्ष,जपान.,) मा. जयमाला ईनामदार (ज्येष्ठ नाट्य चित्रपट कलावंत,) मा. क्षमा वैद्य,(ज्येष्ठ अभिनेत्री) मा.स्वयंप्रभा मोहिते पाटील, (प्रसिद्ध उद्योजिका, समाजसेविका, अकलूज), मा.भाग्यश्री देसाई,(प्रसिद्ध नाट्य,चित्रपट अभिनेत्री), मा. सतीश इंदापुरकर(ज्येष्ठ दिग्दर्शक. साहित्यिक,कलावंत) मा.सुजीत दातार, सोल्यूशनमाइंड यांच्या प्रमुख उपस्थितीत , बालगंधर्व रंगमंदीर पुणे येथे नुकताच संपन्न झाला. संगीत रंगभूमीवरील प्रसिद्ध नाट्यगीते, निवडक नाट्य प्रवेश, सादर करीत सोहळ्यास सुरुवात झाली. कलाकारांनी संगीत रंगभूमीच्या आठवणींना उजाळा देत स्व.प्रमोद दामले यांच्या स्मृती जागृत केल्या. स्व.प्रमोद दामले यांचा संपूर्ण जीवनप्रवास बालपणापासून तेअखेर पर्यंतचा कलाविष्कार या वेळी सादर झाला. दादा कोंडके यांच्या चित्रपटातील गाजलेली गाणी, यावेळी कलाकारांनी सादर केली. अगदी फिल्मफेअर पुरस्कारास शोभेल अशा पद्धतीने एकाहून एक सरस , उत्तमोत्तम कलाविष्कार या वेळी रंगमंचावर सादर झाले. शोभा धामस्कर यांच्या भरतनाट्यमने सुरवात झाली. सलग सहा तास चाललेल्या या भव्य दिव्य सोहळ्यात समाजातील विविध क्षेत्रातील मान्यवरांना विविध पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले. तितिक्षा चित्र महर्षी जीवनगौरव पुरस्कार मा. राजदत्त सर दत्तात्रय अंबादास मायाळू यांना मानपत्र,सन्मानचिन्ह,पुणेरी पगडी,मानवस्त्र, अक्षरधन देऊन सन्मानीत करण्यात आले. तितिक्षा प्रमोद गौरव (स्व. प्रमोद दामले स्मृती) पुरस्कार मा. दिलीप घारे,.प्रसिद्ध अभिनेते, (प्राध्यापक, नाट्य विभाग प्रमुख. छत्रपती संभाजी नगर) यांना प्रदान करण्यात आला. मा.विजय सातपुते,मा.सुजित कदम,मा.गौरव पुंडे यांना स्व. रविंद्र धामस्कर व स्व. यशवंत लक्ष्मण सातपुते स्मृती प्रित्यर्थ, कृतज्ञता पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले. तितिक्षा आरोग्यदूत .डॉ.मुकुंद खळदकर स्मृती पुरस्कार..... मरणोत्तर..स्व. सुरेंद्र चव्हाण यांना देण्यात आला. डॉ.चव्हाण कुटुंबीयांनी तो स्विकारला. तितिक्षा नाट्यशारदा जीवनगौरव पुरस्कार मा ✻. रजनी भट प्रसिद्ध नाट्य ,चित्रपट अभिनेत्री यांना प्रदान करण्यात आला.त्यावेळी मा.राजश्री आठवले. मा.क्षमा वैद्य. सोल्यूशनमाइंड चे सर्वेसर्वा मा .सुजीत दातार उपस्थित होते. ✻डॉ. स्वयंप्रभा मोहिते पाटील. अकलूज, संजीवनी काळे, शोभा रविंद्र

धामस्कर,गोवा, विश्व सुंदरी,डॉ. प्रचिती पुंडे, हेमलता गीते,अहमदनगर, दुर्गा अभय भोर, भोसरी, सोनाली सुजित कदम,पुणे, रेखा देशमुख,अमरावती, आम्रपाली उर्फ अमित मोहिते, यांना नवदुर्गा पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले✻. तितिक्षा हिरकणी पुरस्कार संगीता राजपूत ठाणे यांना देण्यात आला. तितिक्षा काव्य समर्पण ✻स्व. उर्मिलाताई कराड स्मृती पुरस्कार... ज्येष्ठ कवयित्री. मा.मंदाताई नाईक यांना प्रदान करण्यात आला. तितिक्षा संस्थेचे कार्य, स्वरुप, हेतू व क्षेत्र राज्य व्यापी आहे. समाजाचे अस्तित्व, सातत्य, स्वास्थ्य सुरक्षितता आणि साहित्य, कला, शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रातील नाट्यकलावंत यांच्या संवर्धनार्थ, आणि स्व. प्रमोद मोरेश्वर दामले यांच्या स्मरणार्थ स्थापन झालेल्या तितिक्षा संस्थेने दशकपूर्ती कडे प्रस्थान झाले आहे .तितिक्षा इंटरनॅशनल सांस्कृतिक संस्था ही प्रामुख्याने मुख्यत्वे धार्मिक, वैज्ञानिक व कलात्मक क्षेत्रांना योगदान देऊन सांस्कृतिक ठेव्याचे संरक्षण-संवर्धन करते; तसेच संस्कृतीचे काटेकोरपणे संरक्षण करते. रुढी, परंपरा, लोकरीती, संकेत, लोकाचार प्रोत्साहन आणि कला संवर्धन याहेतुने संस्था आबालवृद्धांसाठी विविध स्तरांवर ,संपुर्ण वर्षभर नाट्य आणि चित्रपट कलावंतासाठी विविध कार्यक्रम आयोजित करणार असल्याचे संस्थेच्या संस्थापिका प्रिया प्रमोद दामले यांनी जाहीर केले. संगीत रंगभूमी आणि नाट्य चित्रपट क्षेत्रातील.... अनेक कलावंतांचना ङ्गबहारदार सादरीकरणङ्क सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. साहित्य, कला, शैक्षणिक, सांस्कृतिक व नाट्यचित्रपट क्षेत्रातील कलावंत यांच्या कलासंवर्धनार्थ स्थापन झालेल्या तितिक्षा इंटरनॅशनल या संस्थेच्या दशकपूर्ती सोहळ्यात अनेक दर्दी रसिक आवर्जून उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रमाचे अविस्मरणीय सूत्रसंचालन मा.अश्विनी दाशरथे यांनी केले. विजय सातपुते,सौ. शीला इंदापुरकर,दीपाराणी गोसावी,अजया मुळीक,अजिता मुळीक, पुरुषोत्तम कुंटे,गौरव पुंडे,योगेश हरणे,लक्ष्मण चव्हाण, साहिल मोरे यांनी सदर सोहळ्याचे यशस्वी आयोजन केले.

बीड/महाराष्ट्र
विशेष वार्ता

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

शनिवार ७ डिसेंबर २०२४
https://lokaarambh.com

महाराष्ट्रातील या भागांमध्ये पाऊस, शेतकऱ्यांवर संकट, पुन्हा थंडी कधीपासून सुरु होणार?

महाराष्ट्रात सध्याच्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे.

प्रतिनिधी

महाराष्ट्रात सध्या हिवाळा सुरु आहे. पण हिवाळ्यातही अनेक ठिकाणी पाऊस पडल्याने शेतक–यांचं मोठं नुकसान होताना दिसत आहे. राज्यातील काही भागांमध्ये अचानक पावसाची हजेरी लावली आहे. तसेच काही भागांमध्ये ढगाळ वातावरण आहे. त्यामुळे गरमी देखील वाढली आहे. सर्वसामान्य नागरिकांना या गरमीपासून आणि अवकाळी पावसापासून कधी मुक्ती मिळेल? याबाबत आम्ही माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे. पुणे हवामान विभागाचे प्रमुख के. एस. होसाळीकर यांनी सध्याच्या हवामानावर महत्त्वाची प्रतिक्रिया दिली आहे. ङ्गसांगली, सातारा, कोल्हापूर, लातूर, उस्मानाबाद जिल्ह्यांमध्ये हलक्या पावसाची शक्यता आहे. काल नाशिकमध्ये ३१ मिलिमीटर पाऊस पडला. गेल्या तीन–चार दिवसात सहा ते सात डिग्री तापमान वाढले. वा–याची दिशा बदलली आहे. त्यामुळे किमान तापमानात वाढ झाली आहे. आत्ताची परिस्थिती आहे तशी परिस्थिती पुढील तीन ते चार दिवस अशीच राहणार असल्याची शक्यता आहे. पुढील आठवड्यापासून पुन्हा एकदा थंडीला सुरुवात होईलङ्ग, अशी महत्त्वाची माहिती के. एस. होसाळीकर यांनी दिली. दरम्यान, राज्यात कालपासून आतापर्यंत कुठे आणि किती पाऊस पडला ते देखील जाणून घेऊयात.

छत्रपती संभाजीनगरमध्येही पाऊस

छत्रपती संभाजीनगर शहरासह ग्रामीण भागात ढगाळ वातावरण आहे. तसेच काही ठिकाणी अचानक पाऊस पडला. या पावसामुळे तुरीसह कांदा रोप आणि अन्य पिकांचे नुकसान होण्याची शक्यता आहे. यामुळे शेतकरी चिंतेत आहे. तसेच नुकसानग्रस्त भागातील शेतक–यांना सरकारकडून मदत केली जाईल, अशी आशा शेतक–यांकडून व्यक्त केली जात आहे.

RBI कडून शेतक–यांना गुड न्यूज ! नवीन धोरणामुळे शेतक–यांना मोठा आर्थिक फायदा मिळणार

भारतीय रिझर्व बँकेकडून शेतक–यांना मोठा दिलासा देण्यात आला आहे. नवीन धोरणाचा विशेषतः लहान शेतक–यांना याचा मोठा आर्थिक फायदा मिळणार मुंबई : वृत्तांत भारतीय रिझर्व बँकेकडून शेतक–यांना मोठा दिलासा देण्यात आला आहे. शेतक–यांसाठी तारणमुक्त कर्जाची मर्यादा वाढवली असून शेतकरी तारणमुक्त कर्ज मर्यादा २ लाख रुपये करण्यात आली आहे. याआधी शेतकरी तारणमुक्त कर्ज मर्यादा १.६ लाख इतकी होती ती आता वाढवून २ लाख रुपये करण्यात आली आहे. यामुळे विशेषतः लहान शेतक–यांना याचा मोठा आर्थिक फायदा मिळणार आहे. या घोषणेचा स्पष्ट अर्थ असा आहे की आता शेतक–यांना २ लाख रुपयांपर्यंतच्या कर्जासाठी कोणतेही तारण घ्यावे लागणार नाही. पूर्वी ही मर्यादा १.६ लाख रुपये होती, म्हणजेच कोणतेही तारण न देता, शेतकरी केवळ १.६ लाख रुपयांपर्यंतच कर्ज घेऊ शकत होते, ज्याची मर्यादा आता २ लाख रुपये झाली आहे. याबरोबच ठइख गव्हर्नर शक्तीकांत दास यांनी दिलेल्या माहितीनुसार सलग ११ व्यांदा व्याजदरात कोणताही बदल केलेला नाही. आरबीआयने रेपो दर, सीआरआर दर कायम ठेवले. धोरणाबाबत एमपीसीची मतटस्थफभूमिका कायम ठेवली आहे. **RBI**ने रेपो दर ६.५०%, स्थायी ठेव सुविधा दर ६.२५% आणि सीमांत स्थायी सुविधा दर ६.७५% वर कायम ठेवला आहे. रेपो दर म्हणजे कोणत्याही देशाची मध्यवर्ती बँक ज्या दराने व्यापारी बँकांना कर्ज देते. जेव्हा बँकांकडे निधीची कमतरता असते, तेव्हा ते मध्यवर्ती बँकेकडून पैसे घेऊ शकतात. या पैशावर रेपो दर लावला जातो. रेपो दराच्या मदतीने, एमपीसी महागाई नियंत्रित करते. जेव्हा त्याला महागाई नियंत्रित करायची असते. त्याच वेळी, जेव्हा बाजारात अधिक पैसे इंजेक्ट करण्याची आणि आर्थिक वाढीस समर्थन देण्याची आवश्यकता असते, तेव्हा रेपो दर कमी केला जातो. तसेच बँकांसाठी **CRR** ४% पर्यंत कमी बँकांसाठी **CRR** ४.५% वरून ४% पर्यंत कमी केला. **CRR** ०.५०% ने कमी झाला. १.१६ लाख कोटी रुपयांची अतिरिक्त रोख प्रणालीमध्ये येईल. गव्हर्नर पुढे म्हणाले की, भारताचा जागतिक व्यापार मजबूत झाला आहे आणि खंड वाढला आहे. आरबीआयचे मुख्य काम महागाईवर नियंत्रण ठेवणे हे आहे. किमतीच्या स्थिरतेबरोबरच वाढही महत्त्वाची आहे. अर्थव्यवस्थेतील पुनर्प्राप्ती सुरूच – **Q2FY**२५ जीडीपी वाढ अपेक्षेपेक्षा खूपच कमी होती. **Q3FY**२५ ऋख्झ वाढीचा अंदाज ७.४% वरून ६.८% पर्यंत कमी झाल्यानंतर पुनर्प्राप्ती चालू आहे.

पाटोद्यात सामुहिक अभिवादन करत महापरिनिर्वाण दिन साजरा

पाटोदा प्रतिनिधी:–पाटोदा शहरातील भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर चौकात महामानव भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनाचे औचित्य साधून दरवर्षीप्रमाणे याही वर्षी तालुक्यातील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचे अनुयायी यांच्या वतीने सहा डिसेंबर रोजी सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास सामुहिक अभिवादन करण्यात आले. प्रथमता पाटोदा पोलीस ठाण्याचे प्रभारी पोलीस निरीक्षक जाधव साहेब व अँडव्होकेट सचिन जावळे यांच्या हस्ते दिप प्रज्वलन करण्यात आले यानंतर भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजासाठी केलेल्या अमुल्य योगदानाचे स्मरण करण्यात आले. यानंतर बौद्ध वंदना करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. यावेळी राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, डॉक्टर, पत्रकार तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते..

शिवाजी राजे लक्ष्मणराव भोर यांना राज्यस्तरीय ज्ञानसिंधु समाज रत्न पुरस्कार २०२४ जाहीर

नाशिक वृत्तसेवा साहेबराव नंदन तात्या ॅ राज्यातील साहित्य क्षेत्रातील बहुआयामी, बहुमानांकीत, सर्वत्र चर्चिला जाणारा ज्ञानसिंधु प्रकाशन संस्था नाशिक यांचा, सालाबाद प्रमाणे राज्यातील सर्वच क्षेत्रातील निवडक राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक धार्मिक तसेच कवी, लेखक, संपादक, अशा विविध क्षेत्रातील मान्यवरां मधून बोटावर मोजता येतील असे, बहुविध पुरस्कार प्रदान करण्यात येतात. २०२४ चा सामाजिक क्षेत्रातला, राज्यस्तरीय ज्ञानसिंधू समाज रत्न पुरस्कार नाशिक येथील कलाव्यासंगी, राजकीय, सामाजिक, समाजसेवक आध्यात्म ते राजकाराणाशी निगडीत असलेले शिवसेना नाशिक जिल्हा उपप्रमुख ि एकनाथराव शिंदे गट ॅ मा. श्री शिवाजीराव ि राजे ॅ लक्ष्मणराव भोर यांना नुकताच जाहीर करण्यात आल्याचे निवड पत्र संस्थेचे चिफ प्रमोटर तान्हाजी खोडे यांच्या सहीचे प्राप्त झाले आहे.



॥ ज्ञानसिंधु प्रकाशन ॥
ISBN ॥ आकर्षक मुखपृष्ठ ॥ वितरण ॥ ई–बुक
प्लॉट नं. १७०/गट नं. १८४ जय गणेश कॉलनी श्रमिकनगर, सातपूर नाशिक - ४२२०१२
मो. ९८२३३१६८३८ / ७०४०८१८३८५
dnyansindhup@mail.com, mahilavishw@gmail.com

जा. क्र. Dnyp/Aw/२१/०२४
दि. ०४.१२.२०२४

‘ पुरस्कारार्थी निवड पत्र ’

प्रती,
मा. श्री./ सौ. शिवाजी (राजे) लक्ष्मणराव भोर

महोदय,

आपले सामाजिक, साहित्यिक, सांस्कृतिक, कला, शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्रातील योगदान देणारे कार्य पाहता ज्ञानसिंधु प्रकाशन, नाशिक या संस्थेच्या एकदिवसीय राज्यस्तरीय साहित्य संमेलनात आपणास राज्यस्तरीय ज्ञानसिंधु समाज रत्न पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. त्यासाठी आपण सहकुटुंब दिनांक २१/१२/२०२४ शनिवार रोजी ठिक १२.०० वाजता राणी भवन, अशोक स्तंभ चौक, नाशिक येथे पुरस्कार स्विकारण्यासाठी पाठविलेल्या प्रस्तावासह उपस्थित राहावे. ही विनंती.

अभिनंदन !

प्रकाशक
श्री. तान्हाजी खोडे
ज्ञानसिंधु प्रकाशन, नाशिक
मो. ९८२३३१६८३८

शिवाजीराव राजे भोर हे मितभाषी, मृद स्वःभावाचे, सेवाकार्य तप्तर, दुस–ाच्या चेह–यावर नेहमीच स्मितहास्य निर्माण करणारे, आपन व आपला समाज त्याच बरोबर, अठरा पगड जाती, बारा बलुतेदार, तेरा अलुतेदार, नव्हे नव्हे व्यापारी मापारी ते सांस्कृतिक, साहित्यिक, अध्यात्मिक अशा सर्वच क्षेत्रात त्यांचा वावर आहे. यापूर्वी त्यांचे अनेक मान सन्मान सोहळे झाले आहेत.सदरचा पुरस्कार शनिवार दिनांक २१ डिसेंबर २०२४ रोजी, राणी लक्ष्मीबाई भूवण अशोक स्तंभ नाशिक. येथे विविध मान्यवरांच्या उपस्थितीत काव्य संमेलनात, सन्मान पूर्वक प्रदाण करण्यात येणार आहे. त्यांना जाहीर करण्यात आलेल्या पुरस्कारचे सर्वच क्षेत्रातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. विशेषतः मा. ना. श्री दादाजी भूसे साहेब, पालक मंत्री नाशिक जिल्हा, मा. खा. नाशिक श्री हेमंत आप्पा गोडसे, मा. आ. अॅड. राहूलभाऊ ढिकले, श्री अजयजी बोरस्ते शिवसेना उपनेता तथा मा. उपमहापौर नाशिक म. न. पा. मा. पद्माकर मोराडे ि सकाळ वृत्त पत्र समुदाय ॅ मा. आ. सुहास आण्णा कांदे नांदगाव, मा. बाळासाहेब गायधनी, से. नि. पो. उपायुक्त, अॅड रत्नाकर गायकवाड, अॅडमोहणराव निसाळ, अॅड अक्षय कलंत्री कपालेश्वर देवस्थान अध्यक्ष गंगाकाठ पंचवटी नाशिक, अॅड बापूसो. संभाजीराव पगारे, अॅड एन. जी. गायकवाड, डॉ. त्र्यंबक पवार, डॉ. राकेश गावित, साहित्यिक लेखक संपादक साहेबराव नंदन तात्या यांनी विशेष अभिनंदन केले आहे .

जिल्हास्तरीय युवा महोत्सवात मलोकगीत, स्पर्धेत स्वराज गृप प्रथम

बुलढाणा : क्रीडा व युवक सेवा संचालनालयां अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व नेहरू युवा केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने तथा एन एस एस विभागाच्या जिल्हा क्रीडा संकुल येथे जिल्हास्तरीय युवा महोत्सव आयोजित करण्यात आला, यामध्ये बुलडाणा स्वराज्य कला अँकडमी मुलींचा चमूने म लोकगीत गायन स्पर्धेत सर्वोउत्कृष्ट गित सादर करुन,जिल्हा स्तरावर प्रथम क्रमांकाने विजयी झाला .

विजयसिंह राठोड यांचा स्वराज ग्रृप बुलढाणा यांनी जिल्हास्तरीय महोत्सवात विभाग स्तरांवर सहभाग नोंदविला . त्यात वादक – प्रणव डोंगरदिवे, हरिओम गावंडे, श्रीराम गावंडे, तसेच लोकगीत गायिका, कु. स्नेहल पवार, वंशिता तायडे, आरती घोडके, कुमुद पवार, दुर्वाताई म्हस्के, योगिता पवार, वादक, श्रीराम गावंडे, आणि शिवचरण वरपे यांनी सहभाग नोंदविला . रोख रक्कम आणि प्रशस्ती सहभाग पत्र आणि मेमेंटो देवून ग्रृपला उपस्थित मान्यवर व परिक्षक यांचे हस्ते सन्मानित करण्यात आले .यावेळी या महोत्सवात वकृत्व, लोकगीत, कथा लेखन, चित्रकला, लोकनृत्य, आदी कला प्रकार व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते . यावेळी जिल्हा क्रिडा अधिकारी बी एस . महानकर,जिल्हा नियोजन अधिकारी राहूल पवार, प्रा . डॉ. गोविंद गायकी, नेहरू युवा केंद्राचे अजय सिंह राजपूत आदी उपस्थित होते .सदर गायनासाठी व यशस्वीतेसाठी अजयसिंह राठोड, जय राठोड,विजयसिंह राठोड, शाहीर मनोहर पवार यांनी मार्गदर्शन केले .

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com